कोल्हापूर वृत्तवेध                                  पुण्यनगरी



कणबरकर स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार निर्मितीसाठी डॉ. देवानंद शिंदे यांना धनादेश प्रदान करताना शालिनी कणबरकर. सोबत डॉ. अंजली साबळे, डॉ. नमिता खोत, मेघा वागळे, डॉ. अरुण कणबरकर, डॉ. डी. आर. मोरे व डॉ. व्ही.एन. शिंदे.

## माजी कुलगुरू कणबरकर स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पुरस्कार निर्मितीसाठी

# विद्यापीठास २५ लाखाची ठेव

कोल्हापूर/ प्रतिनिधी:

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठास २५ लाख रुपयांच्या ठेवीसाठी धनादेश प्रदान केला. शालिनी कणबरकर यांनी या ठेवीसाठीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी प्राचार्य कणबरकर यांच्या निवासस्थानी भेट दिली. कणबरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून आदरांजली वाहिली. डॉ. कणबरकर यांचे चिरंजीव डॉ. अरुण कणबरकर यांनी कुलगुरू डॉ. शिंदे यांचे स्वागत केले. त्यानंतर कणबरकर कुटुंबीयांच्या वतीने २५ लाख रुपयांचा धनादेश कुलगुरूंकडे सुपूर्द केला.

शिवाजी विद्यापीठाच्या या माजी कुलगुरूंच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' या शिवाजी विद्यापीठासह संयुक्त पुरस्काराची निर्मिती या निधीतून करण्यात येणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाशी केलेल्या सामंजस्य कराराला व्यवस्थापन परिषदेनेही मान्यता दिली आहे. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला प्राचार्य कणबरकर यांच्या १३ एप्रिल या स्मृतिदिनी दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येईल. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असेल. सुयोग्य पुरस्कारार्थीच्या निवडीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय विशेष शोध समिती स्थापन करण्यात येणार असून विद्यापीठाचे कुलसचिव समितीचे पदसिद्ध सदस्य सचिव असतील. ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत सदस्य आहेत.

एखाद्या माजी कुलगुरूंच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबीयाकडून अशा प्रकारचा निधी विद्यापीठास देण्यात आल्याचा हा राज्यातील कदाचित पहिलाच प्रसंग असेल. त्या माध्यमातून कणबरकर यांच्या स्मृती चिरंतन दरवळत राहतील, अशी भावना व्यक्त करून कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कणबरकर कुटुंबीयाना धन्यवाद दिले. या प्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, बीसीयुडीचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा.डॉ. जे. एफ. पाटील यांच्यासह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे, इचलकरंजीच्या व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत, कणबरकर यांच्या कन्या डॉ. अंजली साबळे, मेघा वागळे, डॉ. नमिता खोत उपस्थित होत्या.

शनिवार दि. ५ सप्टेंबर २०१५